नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २८/०१/२०२५ (मंगळवार) सकाळ**

## बुट्टीबोरी येथील घरफोडीच्या गुन्हयातील आरोपीतांना अटक

**पोस्टे बुट्टीबोरी:–** दि. २१/०१/२०२५ रोजी सायंकाळी दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने पोलीस स्टेशन बुटीबोरी हद्दीतील मौजा सातगाव रिधोरा यातील फिर्यादी नामे नंदकिशोर सदाशिव कोसारे वय ४७ वर्ष रा. सातगाव रिधोरा ता. हिंगणा जि. नागपुर यांचे घराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून किचन मधील लोखंडी अलमारी उघडून त्यातील १) जुने वापरते अंदाजे ०८ ते १० ग्रॅम सोन्याची चैन किंमती ३०,००० रू २) नगदी १०,००० रू असा एकूण ४०,००० रू चा अज्ञात चोरानी चोरी करून चोरून नेले आहे. असा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. बुट्टीबोरी येथे अप. क्र. ५८/२०२५ कलम ३३१ (४), ३०५(अ), ३(५) भा. न्या.स अन्वये गुन्हा नोंद असुन तपासात आहे.

सदर घटना ही मौजा सातगाव रिधोरा येथे घडली असल्याचे सदर घटनेचे गांभीर्य लक्षात घेवुन दिपक अग्रवाल (भा.पो.से) उपविभागीय पोलीस अधिकारी नागपुर विभाग नागपुर यांच्या तोंडी आदेशाने व प्रतापराव भोसले पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन बुटटीबोरी यांच्या मार्गदर्शना खाली गुन्हे प्रगटीकरण शाखा पो.स्टे बोरी चे अधिकारी व अंमलदार यांची सदर गुन्हा उघडकीस आणणे कामी पथक गठीत करण्यात आले. सदर गठीत करण्यात आलेले अंमलदार यांनी अज्ञात इसम यांचा शोध घेणे करीता घटनास्थळ व पोस्टे परिसरातील मुखबिरद्वारे अनोळखी इसमा बाबत माहिति घेतली असता यातील सराईत गुन्हेगार सातगाव रिधोरा येथील असल्याचे विश्वसनीय खबरे वरून माहिती मिळाल्याने सदर सराईत गुन्हेगार इसम **१) आकाश किसनाजी तुमडाम, वय २८ वर्ष** यास तो काम करत असलेल्या कंपनीतून अटक करून गुन्हया संबंधाने विचारपूस केली असता **२) अतुल रंगलाल लालसरे वय ३५ वर्ष दोन्ही रा. सातगाव रिधोरा ता. हिंगणा जि. नागपूर** याचे सोबत गुन्हा केल्याची कबुली दिल्याने सातगाव येथून अतुल रंगलाल लालसरे याला अटक करून पो.स्टे चे गुन्हया संबंधाने विचारपुस केली असता गुन्हा केल्याची कबुली दिल्याने सदर गुन्हयातील किंमती मुद्देमाल यातील आरोपी कडून १) जुने वापरते अंदाजे ०८ ते १० ग्रॅम सोन्याची चैन किंमती ६७,००० रू २) १ ग्रॅम सोन्याचे लॉकेट किमती ५००० रू ३) नगदी १८,००० रू असा एकूण ९०,००० रू चा किंमती मुद्देमाल हस्तगत केला आहे.






पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर